# रत्नागिरी एक्सप्रेस

# मुकुल माधव विद्यालयाचे शालांत प्रमाणपत्र परिक्षेमध्ये घवघवीत यश

**रत्नागिरी/प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मुकुल माधव विद्यालयाची पहिली तुकडी इयत्ता दहावीच्या मार्च २०२० मध्ये प्रविष्ट झाली होती. मुकुल माधव विद्यालयातून एकूण २६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये उत्तम यश संपादन केले आहे. एकूण २६ विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांनी ७५ % च्यावर गुण प्राप्त करून विशेष श्रेणी प्राप्त केली आहे. तर उर्वरित सात विद्यार्थ्यांना ६४% ते ७३% यादरम्यान गुळ प्राप्त झाले आहेत. मुकुल माधव विद्यालयाची ही पहिली तुकडी असल्याने या मुलांना मार्च २०१९ पासून विशेष मार्गदर्शन करण्यात येत होते.




*मुकुल माधव विद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी छायाचित्रात दिसत आहे.*

अभ्यासाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुकुल माधव विद्यालय तर्फे विशेष लक्ष देण्यात आले होते.

शिक्षणाचा हा वसा पुढे नेण्याच्या दृष्टीने तसेच ग्रामीण भागातील मुलांना पुणे मुंबई सारख्या ठिकाणी देण्यात येणार्या उच्च प्रतीच्या शिक्षणाचा दर्जा कायम टिकवत मुकुल माधव विद्यालय तर्फे शैक्षणिक वर्ष २०-२१ पासून ज्युनिअर कॉलेजची मुहूर्तमेढ रोवण्यात येणार आहे. सायन्स आणि कॉमर्स या दोन शाखासह जुनिअर कॉलेज ची सुरुवात या वर्षापासून करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयासाठी विद्यार्थ्यांना बाहेर जाण्याची गरज नाही तर मुकुल माधव विद्यालयाच्या जूनियर कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा असे आवाहन करण्यात येणार आहे. जुनिअर कॉलेज ची इमारतही लवकरच पुर्णतःकडे येत आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुकुल माधव विद्यालयाच्या शिक्षकांचे अमुल्य मार्गदर्शन लाभले. मुकुल माधव फौंडेशनच्या व्यवस्थापक विश्वस्त सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षक वर्ग व पालकांचे मनःपूर्वक आभार मानले.

सौ. रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या की, आमचे विद्यार्थी पालक शिक्षक आणि मुकुल माधव विद्यालयाचा संपूर्ण चमू यांच्यामुळे आज आम्हाला अभिमानाचा क्षण अनुभवता येत आहे. खरंतर आमची शाळा फक्त ११ वर्षांपूर्वी सुरू झाली आणि या दरम्यान अनेक संकटांना सामोरे जात आलो परंतु समाजाला जास्तीत जास्त चांगले देण्याचा आमचा प्रयत्न सफल झाला आहे. मी परत एकदा आमच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करते तसेच त्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कौतुक करून त्यांना आनंदी आरोग्यदायी भविष्यासाठी शुभेच्छा देते.